श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

४९ वा वार्षिक अहवाल

सभेची सूचना

फक्त सभासदांसाठी

महोदय,

आपल्या पतपेढीची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ सप्टेंबर २०१४ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता काशिनाथ धुरु हॉल, पहिला मजला, छबिलदास मार्ग, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. येथे श्री. दिलीप दशरथ केळंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली खालील कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

सभेत होणारी कामे

१) रविवार दि. १८/०८/२०१३ रोजी झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.
२) सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकामधील अंदाजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी घेणे.
३) स्विकृत संचालकांची ओळख व निवडीस मंजूरी देणे.
४) दि. ०१/०४/२०१३ ते दि. ३१/०३/२०१४ या कालावधीचा जमाखर्च, ताळेबंद पत्रक व अहवाल स्विकारणे व त्यास मंजुरी देणे.
५) सन २०१३-२०१४ चा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सादर करणे व स्विकृती देणे.
६) सन २०१३-२०१४ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल सादर करणे व स्विकृती देणे.
७) व्यवस्थापक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
८) सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
९) सन २०१४-२०१५ या सालाकरिता अंतर्गत हिशेब लेखापरिक्षकाची निवड करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.
१०) सन २०१४-२०१५ या सालाकरिता निबंधकानी जाहिर केलेल्या पॅनल मधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
११) श्री विश्वेश्वर सहकारी पतसंस्थेमध्ये भविष्यात दुसरी पतसंस्था विलिनीकरणाबाबत परवानगी घेणे.
१२) अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर कामे.

आपला विश्वासू,
व्यवस्थापक समितीच्या आदेशानुसार
श्री. निलेश विठ्ठल सकपाळ
मानद् सचिव

मुंबई,
दिनांक : २०/०८/२०१४

❊ विशेष सूचना ❊

१) सर्वसाधारण सभेची गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा स. ९.३० वा. तहकुब समजून ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरू करण्यात येईल व सुचनेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कामकाज पार पाडले जाईल.
२) ज्या सभासदांना पतपेढीचे कामकाज, लेखापरिक्षकांचा अहवाल, ताळेबंद पत्रक, नफातोटा पत्रक सभासदांच्या माहितीसाठी उपलब्ध आहे. ज्यांना अहवाल पहावयाचा असेल, त्यांना तो संस्थेच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाहता येईल. लेखी सूचना अगर ठराव सुचवायचे असल्यास ते त्यांनी पतपेढीच्या कार्यालयात दि. २० सप्टेंबर २०१४ पर्यंत पोहचतील असे पाठवावेत. अहवाल वा अन्य कोणत्याही बाबतीत अधिक माहिती पाहिजे असल्यास कृपया संस्थेच्या मुख्य कार्यालयात सचिवांशी संपर्क साधावा.
३) सभेला येताना कृपया हा अहवाल घेऊन येणे.
४) ज्या सभासदांच्या राहण्याच्या किंवा नोकरीच्या पत्त्यात बदल झाला असेल, त्यांनी आपला पत्ता कार्यालयात लेखी कळविणे.

(टीप : सभा सुरू होण्यापूर्वी चहा व नाश्त्याची व्यवस्था सकाळी ९ वा. करण्यात आलेली आहे.)

।। विना सहकार नाही उद्धार ।।

अध्यक्षांचे मनोगत

सन्माननीय सहकार बंधु आणि भगिनींनो सस्नेह नमस्कार !

तेली सेवा समाज, मुंबई संस्थापित श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्या., मुंबई या संस्थेचा ४९ वा वार्षिक अहवाल आपल्या हाती देताना अध्यक्ष दिलीप दशरथ केळंबेकर व माझे सहकारी संचालक यांना आनंद होत आहे. मागील वर्षामध्ये ठेवलेली ध्येय, उद्दीष्टपूर्तीसाठी केलेले प्रयत्न यातून नेत्रदिपक अशी कामगिरी करण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. ह्या सहकाराच्या कार्यात आपण जी साथ दिलीत ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

अहवाल सालात ९७ व्या घटना दुरुस्तीसह आदर्श उपविधी २०१३ च्या अंमलबजावणी काटेकोरपणे करीत कार्य करताना अहवाल सालातील महत्वाच्या घडामोडी लक्षात घेणे फार महत्वाचे ठरणार आहे. निधीचे नियम मंजूर करुन घेतल्यामुळे श्री विश्वेश्वर सभासद कल्याण निधी, श्री विश्वेश्वर शिक्षण निधी, श्री विश्वेश्वर लोकोपयोगी कार्य निधी व कर्मचारी कल्याण निधी चा विनियोग सभासदांच्या हितासाठी वापरण्यास संस्थेने सुरुवात केली आहे. सभासदांच्या मागणीवरुन गृहबांधणी/फ्लॅट खरेदी (स्थावर तारण कर्ज), स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि जास्तीत जास्त कर्ज रु. ५० लाखां पर्यंत करुन घेण्याबाबत उपनिबंधकाच्या कार्यालयातून मंजूरीचा आदेश संस्थेस प्राप्त झाला आहे व दिर्घ मुदत कर्ज कालावधी १० वर्षावरुन २० वर्षापर्यंत वाढ करुन घेण्यात यश प्राप्त झाले आहे.

अहवाल सालात संस्थेला १२ कोटी ३३ लाखाहून अधिक उलाढाल करण्यात यश आले असून वसूल भाग भांडवल रु. १, ४७, ७६, ३००/- पर्यंत वाढ झालेली आहे. विविध ठेवीच्या योजनांमध्ये रु. १,६८,६८,२३०/- वाढ होवून रु. ६,४४,९८,७०५/- झाल्या आहेत. अहवाल सालात रु. ४,५९,८१,४८५/- इतके तारणी कर्ज दिलेले असून रु. ६,५३,५४,७६१/- इतके कर्ज येणे शिल्लक आहे. रु. ७,९४,५८१/- थकबाकी वर्षभरात वसूल केलेली आहे. आजपर्यंत वाटण्यात आलेले कर्ज रक्कम व थकीत कर्जाची रक्कम यातील फरक म्हणजे अनुत्पादित कर्ज (एन.पी.ए.) याची तरतूद याआधीच थकीत कर्जाच्या रकमेपेक्षा जास्त झाल्याने रुपये ४०,२५,०००/- ह्या आर्थिक वर्षाच्या नफ्यात वर्ग करण्याचे मार्गदर्शन वैधानिक लेखा परिक्षकांनी केल्याने या वर्षीचा नफा रु. ४४,३२,९१५.०१ या मध्ये वाढ होवून रु. ८४,५७,९१५.०१ इतका झालेला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत संस्थेच्या उलाढालीत रु. २,३७,९६,७३५/- इतकी वाढ झालेली आहे. संस्थेत अहवाल सालात तरुणांचा सहभाग वाढविण्यासाठी विविध सभासद प्रशिक्षण वर्ग व परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यात सभासदांनी सहभाग घेतला व सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद !

आम्ही मागील वर्षामध्ये मालाड व भांडूप येथे संस्थेकरीता नवीन जागा घेवू असे आपणांस सांगितले होते त्याप्रमाणे आम्ही मालाड (पूर्व) येथे संस्थेच्या शाखेसाठी प्रशस्त जागा घेवून त्या जागेचे नुतनीकरण सुरु केले आहे. नवीन शाखा सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून आपण एखादी अवसायनात असलेली संस्था मा. निबंधकांच्या मार्गदर्शनाने

आपल्या संस्थेत सामावून घेणे आवश्यक आहे. यासाठी आमचे सर्वतोपरी प्रयत्न सुरु असून, याकामी आपली मान्यता आवश्यक आहे. त्यातूनच आपणास मालाड व भांडूप येथे शाखा सुरु करणे शक्य होवू शकेल.

संस्थेच्या वाटचालीत आतापर्यंत आपण मोलाची साथ देत आलात तशी पुढेही देत रहाल यात शंका नाहीच. प्रत्येक सभासदाने किमान स्वतःच्या परिचयाचे किमान ४ ते ५ नवीन सभासद केल्यास भविष्यात सभासद वाढण्यास मदत होईलच. त्याचप्रमाणे विविध ठेव योजना संस्थेने सुरु केलेल्या आहेत. विशेष करुन ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मासिक प्राप्ती योजना', तसेच मुलांच्या शिक्षणासाठी, मंगल कार्यासाठी, सभासदांना बचतीची सवय लावण्यासाठी 'लखपती ठेव योजना', आवर्त ठेव योजना'(आर.डी.) सुरु आहेत. यात जास्तीत जास्त सहभाग घेवून सहकार्य करावे. तसेच अक्षय वृद्धी ठेव योजना, श्री विश्वेश्वर वास्तू सिद्धी ठेव योजना व दामदुप्पट ठेव योजना फारच फायदेशीर आहे. त्यातही गुंतवणूक केल्यास आपणास चांगला फायदा होवू शकेल. तसेच विविध कर्ज योजनांचा गरजेनुसार लाभ घेतल्यास निश्चितच आपली सेवा करण्यात आम्हाला आनंद वाटेल. आपल्या प्रत्येक कुटुंबासाठी व कुटुंबातील प्रत्येक सज्ञान सदस्यासाठी आम्ही सदैव सेवा देण्यास तत्पर आहोत.

मागील वर्षी आयकर खात्याकडे संस्थेचे आपील सुरु असून तो निर्णय संस्थेच्या बाजूस लावण्यात ५०% यश आले आहे. अजून पूर्ण निर्णय लागावयाचा आहे. निश्चितच तो १००% आपल्या बाजूने लागेलच याची खात्री वाटते. पुढील आर्थिक वर्षात भांडूप परिसरात संस्थेसाठी जागा घेण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून इमारत फंड वाढविण्यात येत आहे. यासाठी आपण मान्यता द्यावी तसेच राखीव निधी २५% नफ्यातून वर्ग करण्यात येतो तो मा. जिल्हा निबंधक यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६६(२) अन्वये संस्थेस २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये निव्वळ नफ्याच्या १०% एवढी रक्कम राखीव निधीस वर्ग करण्यास परवानगी दिली आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद. दि. ३१/०८/२०१० रोजी पतसंस्थेचा कार्यभार आम्ही स्वीकारला याला चार वर्ष पूर्ण झाली असून पुढील १ वर्ष शिल्लक आहे. या कालावधीत संस्थेची उलाढाल २५ कोटी पर्यंत नेण्याचा मानस आहे. मालाड व भांडूप शाखा सुरु करुन ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न आम्ही सर्व संचालक मंडळ करीत आहोत. आपल्या पाठींब्याने त्यात यश मिळो, हिच ईश्वर चरणी प्रार्थना. भावी संचालक मंडळात नव्या उमेदीचे व उच्च महत्त्वाकांक्षेचे कार्यकर्ते संचालक म्हणून संस्थेस लाभोत व हा वटवृक्ष बहरतच जावो, सभासदांच्या जीवनात नवचैतन्य घेवून येवो ही अपेक्षा व्यक्त करुन माझे मनोगत पूर्ण करतो.

|| जय सहकार || जय महाराष्ट्र ||

श्री. दिलीप दशरथ केळंबेकर
अध्यक्ष

कार्यकारी मंडळ : कार्यकारी मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या त्याची उपस्थिती खालीलप्रमाणे होती

❊ संचालक मंडळाची उपस्थिती दर्शविणारा तक्ता ❊

अ.क्र.	संचालकांची नावे	एकूण सभा	एकूण उपस्थिती
१	श्री. दिलीप दशरथ केळंबेकर	१४	१४
२	श्री. भगवान (विलास) सखाराम सातार्डेकर	१४	१४
३	श्री. निलेश विठ्ठल सकपाळ	१४	१४
४	श्री. किशोर घारु रसाळ	१४	१३
५	श्री. प्रकाश आत्माराम डिचोलकर	१४	१३
६	श्री. जयंतकुमार आत्माराम मेहेर	९	९
७	श्री. जनार्दन गंगाराम गवाणकर	१४	१३
८	सौ. देवयानी विष्णु सातार्डेकर	९	९
९	श्री. प्रमोद काशिनाथ नाचणकर	१४	१२
१०	श्री. दिपक जानू जाधव	१४	१०
११	श्री. संजय महादेव बळगे	१४	११
१२	श्री. मिलिंद महादेव तटकरे	१४	८
१३	श्री. चंद्रकांत केशव कामतेकर (दि. १७/१२/१३ पर्यंत)	९	४
१४	श्री. मोहन रामचंद्र पवार (संचालक पद रद्द दि. १३/०७/१३ पर्यंत)	४	३

नफा : अहवालसाली पतपेढीला रु. १,७३,४८,०६०.०० इतका एकूण नफा व रु. ८४,५७,९१५.०१ इतका निव्वळ नफा झालेला आहे. मागील सालचा शिल्लक नफा रु. ६६६.७६ जमेस धरता रु.८४,५८,५८१.७७ ची वाटणी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

❊ नफा वाटणी ❊

गंगाजळी (नफ्याच्या १०%)	:	रु.	८,४५,८५८.००
१,४७,७६,३४० भागावर १३% प्रमाणे लाभांश (संगणीकृत प्रणालीप्रमाणे)	:	रु.	१७,७१,४७२.००
सभासद कल्याण निधी	:	रु.	८४,५००.००
कर्मचारी कल्याण निधी	:	रु.	८४,५००.००
श्री विश्वेश्वर शिक्षण निधी	:	रु.	८४,०००.००
इमारत निधी	:	रु.	५०,००,०००.००
सुवर्ण महोत्सव निधी	:	रु.	१,४४,०००.००
लाभांश समीकरण निधी	:	रु.	२०,०००.००
लोकोपयोगी कार्य निधी	:	रु.	८४,०००.००
संगणीकरण निधी	:	रु.	१,९०,०००.००
सभासद प्रोत्साहन निधी	:	रु.	१,५०,०००.००
पुढील वर्षाकरिता नफा शिल्लक	:	रु.	२५१.७७
एकूण	:	**रु.**	**८४,५८,५८१.७७**

गुंतवणूक : अहवालासाली मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अपना सहकारी बँक व इंडियन ओवरसिस बँकेमध्ये रु. ९३,३१,२००/- गुंतवणूक करण्यात आलेले आहेत. वरील बँकेत मार्च २०१४ अखेर मुदत ठेव, कॅश क्रेडिट सर्टिफिकेट व शेअर्स मिळुन रु. ४,८९,०७,००५/- शिल्लक आहेत.

४९ वा वार्षिक अहवाल

सहकारी बंधु आणि भगिनींनो,

आपल्या पतसंस्थेचा दिनांक ०१/०४/२०१३ ते दि. ३१/०३/२०१४ या कालावधीचा ४९ वा वार्षिक अहवाल व जमाखर्च आपल्या हाती देताना कार्यकारी मंडळाला अत्यानंद होत आहे. आपल्या सर्वांच्या भरीव सहकार्याने पतपेढीने सर्वांगीण प्रगती केलेली आहे. हे अहवालाच्या अवलोकनावरून आपल्या नजरेस येईलच, तरीही काही महत्त्वाच्या बाबींचा येथे उल्लेख करणे उचित ठरेल.

सभासद संख्या : मार्च २०१३ अखेर सभासद संख्या ८००१ होती. अहवालासाली २९० नविन सभासद झाले. १८० सभासदांनी राजीनामे दिले. सन २०१४ अखेर **सभासद संख्या ८१११** इतकी झाली आहे.

भाग भांडवल : भाग भांडवलातही मार्च २०१३ अखेर रु. १,३०,१४,६६० जमा होती. अहवालसाली रु. २३,२७,४०० ची वाढ झाली. रु. ५,६५,७२० राजीनाम्यापोटी वजा होऊन **भाग भांडवल रु. १,४७,७६,३४०** इतके झाले आहे.

राखीव व इतर निधी : संस्थेचे जेवढे निधी जास्त तेवढा पाया मजबूत असतो त्यानुसार संस्थेने आपल्या निधीत वाढ केली. **सन २०१३-२०१४ अखेर एकूण निधी रु. २,८२,३६,२७१.३५** एवढा जमा झाला.

निधीचा प्रकार	३१/०३/२०१३ अखेर शिल्लक	अहवालसाली झालेली वाढ	अहवालसाली झालेली घट	३१/०३/२०१४ अखेर शिल्लक
१. राखीव निधी	१,५५,८९,१८५.००	६,६२,०९०.००	–	१,६२,५१,२७५.००
२. इमारत निधी	५३,४६,९५५.००	३,५०,०००.००	–	५६,९६,९५५.००
३. संशयित बुडित निधी	६१,९१,८४५.७५	–	४१,३७,३८३.९०	२०,५४,४६१.८५
४. सभासद कल्याण निधी	४,३६,५००.००	७,०००.००	६,०००.००	४,३७,५००.००
५. श्री विश्वेश्वर शिक्षण निधी	५,१८,४४७.००	२५,०००.००	४८,९६२.००	४,९४,४८५.००
६. लाभांश समीकरण निधी	९,४०,०८३.५०	१०,०००.००	–	९,५०,०८३.५०
७. लोकोपयोगी कार्य निधी	३,०९,३८१.००		१,०००.००	३,०८,३८१.००
८. सभासद प्रोत्साहन निधी	२,२७,२२८.००		६२,३७२.००	१,६४,८५६.००
९. कर्मचारी कल्याण निधी	१,४५,०००.००		५,०००.००	१,४०,०००.००
१०. सुवर्ण महोत्सव निधी	८,४९,०००.००	७,०००.००	–	८,५६,०००.००
११. घसारा निधी	३,१३,७१३.००	१,०४,५७१.००	–	४,१८,२८४.००
१२. संगणीकरण निधी	३,०८,५००.००	–	–	३,०८,५००.००
१३. उत्पादित कर्ज निधी तरतूद	९६,४१०.००	५९,०८०.००	–	१,५५,४९०.००
एकूण	३,१२,७२,२४८.२५	१२,२४,७४१.००	४२,६०,७१७.९०	२,८२,३६,२७१.३५

विविध कर्ज वाटप : ६,५३,६४,७६१/–

मार्च २०१३ अखेर **रु. ५,४६,१६,३४१** कर्ज येणे शिल्लक होते. अहवालसाली सभासदांना एकूण **रु. ४,६०,०१,४८५** चे कर्ज वाटप करण्यात आले व **रु. ३,५२,५३,०६५** कर्ज वसूल झाले. मार्च २०१४ अखेर सभासदांकडून **रु. ६,५३,६४,७६१** एवढे कर्ज येणे शिल्लक आहे.

*** कर्ज वाटपाचा तपशील खालीलप्रमाणे ***

कर्जाचा प्रकार	३१/०३/२०१३ अखेरची शिल्लक	अहवालसाली कर्जवाटप	अहवालसाली कर्ज वसुली	३१/०३/२०१४ अखेरची शिल्लक
१. वैयक्तिक कर्ज	१०,०४,४६९	५,६१,७००	९,६९,३५७	५,९६,८१२
२. व्यावसायिक कर्ज	१,६५,३५,१५३	४८,७५,०००	७७,६२,६४३	१,३६,४७,५१०
३. सोने तारण कर्ज	१,०१,७१,३२१	२,१५,८२,३८५	१,३८,०९,७५४	१,७९,४३,९५२
४. वाहन तारण कर्ज	२,५५,१५,७५०	१,२४,४५,०००	१,११,३८,४०६	२,६८,२२,३४४
५. मुदत ठेव तारण कर्ज	१२,७१,२१७	९,२६,०००	११,४५,६२९	१०,५१,५८८
६. दैनंदिन बचत ठेव तारण कर्ज	४८,०००	४१,५००	८९,५००	०
७. आवर्त ठेव तारण कर्ज	४५,४२३	१,२४,९००	१,४३,४१९	२६,९०४
८. शैक्षणिक कर्ज	२२,३०८	७५,०००	२५,६८७	७१,६२१
९. गृह तारण कर्ज	०	५३,५०,०००	१,५५,९७०	५१,९४,०३०
एकुण	**५,४६,१३,६४१**	**४,५९,८१,४८५**	**३,५२,४०,३६५**	**६,५३,५४,७६१**
१०. उत्सव ॲग्रीम कर्ज	२,७००	२०,०००	१२,७००	१०,०००
एकुण	**५,४६,१६,३४१**	**४,६०,०१,४८५**	**३,५२,५३,०६५**	**६,५३,६४,७६१**

*** दि ३१ मार्च २०१४ पर्यंतचा एन. पी. ए. तक्ता ***

अ. क्र.	मालमत्तेचे वर्गीकरण	खाते संख्या	येणे बाकी ३१/०३/२०१४	येणे बाकीशी प्रमाण	शेकडा तरतूद	एकुण आवश्यक तरतूद
१	२	३	४	५	६	७
अ.	**उत्पन्न देणारी कर्जे**	६५३	६,२१,९६,१०८	९५.१७	०.२५%	१,५५,४९०
ब १	**अनियमित कर्जे**	३	११,८४,२९१	१.८१	५%	५९,२१५
ब २	**संशयित कर्जे**					
	संशयित कर्जे १	५	७,३०,५०७	१.१२	५०%	३,६५,२५४
	संशयित कर्जे २	०	०			०
	संशयित कर्जे ३	२१	१०,२२,७०५	१.५६	५०%	५,११,३५३
	बुडित कर्जे	९	२,२१,१५०	०.३४	१००%	२,२१,१५०
	एकुण	**६९१**	**६,५३,५४,७६१**			**१३,१२,४६२**

एकुण एन.पी.ए. येणे बाकी ब१ + ब २ = ३१,५८,६५३/–

अनुत्पादक कर्जासाठी केलेल्या निधीची तरतूद रु. २२,०९,९५१.८५

पतसंस्थेच्या श्री विश्वेश्वर शिक्षण निधी व सभासद कल्याण निधीची सर्व सभासदानी माहिती घ्यावी आणि ह्या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा.

१) **श्री विश्वेश्वर शिक्षण निधी :** या निधीद्वारे १ जानेवारी २०१४ मध्ये ६१ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ज्या सभासदांची मुले सन २०१३-१४ च्या शालांत, उच्च माध्यमिक, पदवीधर व पदव्युत्तर शासकिय/विद्यापीठ, इ. ४ वी ७ वी स्कॉलरशीप परीक्षा गुणवत्ता यादी उर्तीण झालेली, तसेच क्रीडा, कला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या (जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/जागतिकस्तर) असतील, त्यांनी प्रमाणित गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत दि. ३१/१०/२०१४ पर्यंत कार्यालयात पोच करावी. आवश्यक ती छाननी झाल्यानंतर सत्कार समारंभाची तारीख, वेळ व ठिकाण संबंधितांना कळविण्यात येईल.

नियम : सदर सभासद किमान १ वर्ष अगोदर पतपेढीचे सभासद असणे आवश्यक आहे. सभासदाची जमा भाग रक्कम रु १,०००/- असावी आणि त्याचे सभासदत्व पारितोषिके जाहिर करण्याच्या तारखेपर्यंत चालू असणे आवश्यक आहे.

२) **सभासद कल्याण निधी :**

अहवाल साली खालील सभासदांच्या वारसांना सभासद कल्याण निधीतून मदत देण्यात आली. १) कै. मिनाक्षी गोपाळ राऊत २) कै. सुनिता शांताराम लोकम ३) कै. वनिता अनंत म्हाडगुत ४) कै. महेश काशिनाथ राऊत

नियम : सभासद संस्थेचा सभासद असताना त्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसांना या निधीतून मदत रु. ३,०००/- देण्यात येईल. मयत सभासदाची जमा भाग रक्कम रु. १,०००/- असावी. सभासदाच्या मृत्यूनंतर तीन महिन्याच्या आत सभासदाच्या कायदेशीर वारसाने संस्थेकडे लेखी मागणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्जा सोबत मृत्युचा दाखला जोडणे आवश्यक आहे

सेवक वर्ग : अहवालसाली कर्मचारी वर्गाने आपापली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन दिलेली आहेत. संस्थेच्यावतीने त्यांना धन्यवाद !

अफरातफर : माजी सचिव श्री. रविंद्र रा. झगडे, यांच्याकडून रोख रकमेमधील तफावत रु. २,६६,६८४.१३ येणे बाकी आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

संचालक मंडळातील सदस्य व त्यांच्या नातेवाईकांकडून येणे असलेल्या कर्जाचा तपशील खालील प्रमाणे ३१ मार्च २०१४ पर्यंत

अ.क्र.	सदस्यांची नावे	कर्ज दिनांक	कर्ज रक्कम	कर्ज भरणा	कर्ज शिल्लक	कर्जाचा प्रकार
१	श्री. दिलीप दशरथ केळंबेकर	--	--	--	--	--
अ	सौ. दिपाली दिलीप केळंबेकर	०८/०३/२०१४	८०,०००	०.००	८०,०००	सोने तारण
ब	सौ. दिपाली दिलीप केळंबेकर	१३/०४/२०१३	४८,०००	७,९९९	४०,००१	सोने तारण
क	सौ. दिपाली दिलीप केळंबेकर	०२/०९/२०१३	२०,०००	२,१४१	१७,८५९	साने तारण
२	श्री. निलेश विठ्ठल सकपाळ	३१/१०/२०१२	४,००,०००	३७,०००	३,६३,०००	गृह तारण
अ	श्री. दिनेश विठ्ठल सकपाळ	२७/०८/२०१२	१,५०,०००	३४,७७७	१,१५,२२३	गृह तारण
३	श्री. जनार्दन गंगाराम गवाणकर	०८/०२/२०१४	९,९००	०.००	९,९००	आकस्मित कर्ज
अ	श्री. संजय गंगाराम गवाणकर	१८/१२/२०१२	६,००,०००	५५,३४३	५,४४,६५७	गृह तारण
४	सौ. देवयानी विष्णु सातार्डेकर	३१/०५/२०१३	१,०७,०००	०	१,०७,०००	सोने तारण
	सौ. देवयानी विष्णु सातार्डेकर	३१/०५/२०१३	७३,०००	०	७३,०००	सोने तारण
			१४,८७,९००	**१,३७,२६०**	**१३,५०,६४०**	

लेखा परिक्षण : सन २०१३-२०१४ या वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण शासकीय प्रमाणित हिशेब तपासणीस श्री. बाबासाहेब पवार यांनी केलेले आहे. पतसंस्थेने अहवालसाली रुपये १२ कोटी ३३ लाखाहून अधिक उलाढाल व ढोबळ नफा रु. १,७३,४८,०६०/- व निव्वळ नफा रु. ८४,५७,९१५/- मिळविलेला आहे. या भव्य यशा मध्ये आपले सर्वांचे सहकार्य आहेच. या पतपेढीला आर्थिक वैभवाचे व समृद्धीचे दिवस लाभोत व सर्व सभासदांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य या पतपेढीला लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल आपल्या मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

वैधानिक लेखा परिक्षण : मेसर्स आर. आर. पिंगळे ॲन्ड कं यांनी सदर पतसंस्थेचा सन २०१३-२०१४ या कालावधीचा अहवाल सादर केला आहे. त्यांनी २०१३-१४ या वर्षासाठी पतसंस्थेस लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग दिलेला आहे.

❊ श्रद्धांजली ❊

पतपेढीचे दिवंगत सभासद कै. गंगाराम घारु रसाळ, कै. मिनाक्षी गोपाळ राऊत, कै. सुनिता शांताराम लोकम, कै. वनिता अनंत म्हाडगुत, कै. महेश काशिनाथ राऊत, कै. वासुदेव तेली, कै. राजश्री फोंडेकर, कै. माधव नांदगावकर (तेली सेवा समाज भवन प्रोजेक्ट मॅनेजर), कै. सुगंध जनार्दन वालावलकर, कै. सखाराम धोंडु गावकर, कै. पांडुरंग कुवेसकर (माजी संचालक व माजी तेली सेवा समाज अध्यक्ष श्री. विनायक कुवसेकर यांचे वडिल), कै. बाळकृष्ण पेडणेकर, कै. चंद्रकांत जाधव, कै. विनायक बाईत, भाजपचे ज्येष्ठ नेते कै. गोपीनाथ मुंडे साहेब, हितचिंतक व त्यांचे नातेवाईक आणि राष्ट्रीय किर्तीच्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या पवित्र स्मृतीस आमची भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

कै. माधव नांदगावकर (तेली सेवा समाज भवन प्रोजेक्ट मॅनेजर)



कै. गंगाराम घारु रसाळ

कै. विजय अर्जुन रहाटे

* कृतज्ञता *

मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री मा. अजित पवार, मा. सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील, खासदार श्री. अरविंद सावंत, राज्यमंत्री श्री. सचिनभाऊ अहिर, माजी नगरसेवक श्री. आशिष चेंबुरकर, माजी नगरसेविका सौ. रुपाली पावसकर, माजी नगरसेवक श्री. शशिकांत पाटकर, नगरसेवक श्री. रमाकांत रहाटे, सौ. रत्ना महाले (बेस्ट समिती सदस्या), नगरसेविका सौ. किशोरी पेडणेकर (अध्यक्षा, स्थापत्य समिती शहर), माजी नगरसेवक श्री. सुनिल शिंदे, नगरसेवक श्री. राम आशिष गुप्ता, नगरसेवक श्री. अनिल त्रिंबककर, नगरसेविका, सौ. सुनिता इलावडेकर, नगरसेविका सौ. सिद्धी खुरसुंगे, नगरसेवक श्री. भास्कर खुरसुंगे, नगरसेवक श्री. रुपेश वायंगणकर, नगरसेविका सौ. शुभदा पाटकर, नगरसेविका सौ. रेश्मा नेवरेकर, नगरसेविका कु. स्नेहा झगडे, नगरसेविका सौ. संजना मुणगेकर, नगरसेविका सौ. राजश्री शिरवडकर, वॉर्ड अध्यक्ष श्री. सुबोध बांदिवडेकर, श्री. प्रविण दरेकर (अध्यक्ष-मुंबै बँक), श्री. प्रकाश शिरवाडकर (उपाध्यक्ष-मुंबै बँक) सहकारी खात्याचे अधिकारी मा. निबंधक व उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक -लालबाग शाखेचे अधिकारी, मुंबई जिल्हा म. सहकारी बँक मर्यादित - वरळी व जोगेश्वरी शाखेचे अधिकारी, अपना सहकारी बँक-लोअर परेल व जोगेश्वरी शाखा व्यवस्थापक, इंडियन ओवरसिस बँक - पांडुरंग बुधकर मार्ग शाखा व्यवस्थापक, श्री. रतिकांत पिंगळे (लेखा परिक्षक), श्री. गणेश निमकर, श्री. हनुमंत फाळके साहेब, श्री. संजय गोखले (लेखा परिक्षक), श्री. विलास त्रिंबककर, श्री. सुरेश पडवळकर (संपादक-कोकण स्नेही), श्रीकृष्ण तळावडेकर, मंचेकर ज्वेलर्स-लोअरपरेल, संगीता ज्वेलर्स-जोगेश्वरी, श्री. बाबासाहेब पवार - अंतर्गत हिशेब तपासणीस, श्री. मधुकर आरभावी, श्री. गणेश गावडे, ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे, जी-दक्षिण वॉर्ड ऑफीस अधिकारी, के-वॉर्ड ऑफीस अधिकारी, ॲड. नाना पवार, ॲड. दिनानाथ वालावलकर, ॲड. महादेव शेलार, ॲड. अजय विश्वकर्मा, ॲड. संजय डिचोलकर, श्री. व्ही. व्ही देशपांडे (व्हॅल्युएटर), श्री. मनोहर परुळेकर (ज्येष्ठ समाजसेवक), सौ. मनिषा परुळेकर, श्री. प्रविण पेडणेकर, श्री. संजय चव्हाण, श्री. संदिप वालावलकर, श्री. संदिप परुळेकर, सौ. सतलज परुळेकर, सौ. वैभवी पेडणेकर, श्री. शशिकांत डिचोलकर, श्री. अनंत महाडीक, सौ. संजना चव्हाण, श्रीम. शारदा गायकवाड, श्री. काशिनाथ धामापूरकर, सौ. गीता धामापूरकर, श्रीम. सुंदरा पाटकर, सौ. रुचिरा बणबे, श्री. मधुकर पाटकर, श्रीम. सावित्री सकपाळ, श्री. दिलीप पेडणेकर, सौ. मनिषा तोरसकर, श्रीम. सुमती गावकर, श्री. प्रभुदास दंताला, श्री. गणपत दांडेकर, श्री. कमलाकर रहाटे, सौ. सुधा नागवेकर, श्री. रमेश रहाटे, श्री. प्रतिक माळी, श्री. अशोक रसाळ, श्री. रुपेश लादे, श्री. मंगेश सावंत, श्री. कैलास नांदलस्कर, श्री. विजय रहाटे, श्री. कल्पक वर्तक, श्री. बाबासाहेब मुळीक, श्री. चंद्रकांत टिकुळे साहेब, श्री. एस. एस. कुलकर्णी, जे. गांधी (लेखा परिक्षक), श्री. बबन किर्वे, श्री. रमाकांत बाळू रहाटे, श्री. विठ्ठल भातडे, श्री. देविदास लोटलीकर, श्री. प्रदिप आकेरकर (सचिव, तेली सेवा समाज, मुंबई), श्री. मंगेश लाडकोजी शेट्ये (सचिव, संताजी उत्साही मंडळ, मुंबई), श्री. राजाराम आजविलकर (माजी संचालक),श्री. सुनिल नायकडे (सॉफ्टवेअर व लेखापरिक्षक), हिरा कॉम्प्लेक्स कॉ. हौ. सो. चे पदाधिकारी, श्री संताजी उत्साही मंडळ, तेली सेवा समाज, मुंबई व त्या संस्थेचे असंख्य कार्यकर्ते व आजीमाजी पदाधिकारी, पतसंस्थेचे सर्व कर्मचारी व सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांच्या सदैव भरीव सहकार्याने पतपेढीचा आलेख सतत उंचावत राहिला. यापुढेही त्यांचाच आम्हाला आधार आहे. या सर्वांचे आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत.

आपले नम्र

श्री. दिलीप दशरथ केळंबेकर
अध्यक्ष

श्री. निलेश विठ्ठल सकपाळ
मानद सचिव

सभासदांना नम्र विनंती सभासदांच्या भागावर मिळणारे लाभांश परस्पर बचत खाती वळते करण्याकरिता त्यांचे बचत खाते उघडण्यात आलेले असून त्याबाबतची आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता सभासदांनी पतसंस्थेच्या कार्यालयात येऊन सदरची प्रक्रिया पूर्ण करावी. सभासदांनी येते वेळी दोन फोटो आणणे आवश्यक आहे.

पतपेढीच्या प्रगतीचे बोलके आकडे

तपशील	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११	२०११-१२	२०१२-१३	२०१३-१४
सभासद संख्या	७६१६	७७०२	७८०९	७८१४	७८१३	७७२६	७८०३	७८७८	८००१	८१११
भाग भांडवल	८०,०७,७३०.००	८४,७३,६४०.००	८७,५५,४१०.००	८७,७१,४९०.००	९१,०८,२५०.००	९९,५३,२८०.००	९९,५३,२८०.००	१.०८.३०.९२०.००	१,३०,१४,६६०.००	१,४७,७६,३५०.००
मुदत ठेव	१,००,७०,३२४.००	१,००,३१,१४९.००	१,०४,४०,२९७.००	१,१०,१५,५६४.००	१,६६,५१,९४१.००	२,२६,५३,३७६.००	२,२६,५३,३७६.००	२.६०.६१.३६४.००	३,३८,२७,४०२.७५	४,४६,५४,७२१.००
बचत ठेव	३७,५७,९०१.४०	४४,४६,३७२.८५	५३,१६,५११.२५	६१,८२,००३.९०	६९,०२,७८३.००	७५,११,४३८.९०	८५,४१,५७४.९९	९७,६७,२५०.०९	१,०२,६५,१८०.४४	१,१४,५४,६३४.२४
दैनंदिन बचत ठेव	३,२६,०३६.००	२५,५४७.००	२५,५४७.००	४,०५,६९३.००	७,१२,५२९.००	११,४६,५४२.००	१४,७१,५३९.००	१४,८२,७५२.००	११,८२,७५२.००	१५,४२,५६०.००
आवर्त ठेव	२०,३०,१७३.००	२२,७०,२१४.००	२१,८०,०९८.००	२२,२८,३३३.००	२४,२७,०७५.००	२६,६२,४२१.००	२२,९०,८६०.००	२२,४१,२२५.००	२३,४७,९४०.००	३३,५६,९९०.००
दामदुपट ठेव	२४,२५,१५०.००	१८,५४,४५०.००	१९,०३,९१२.००	६,९०,०६०.००	६,१९,८६०.००	२,९४,९७५.००	७,२००.००	७,२००.००	७,२००.००	३४,८१,८००.००
दिलेले कर्ज	५७,०७,७००.००	५८,३७,५००.००	९४,६६,९५०.००	१,११,४८,०५०.००	१,३३,०६,२००.००	१,५४,७४,०००.००	१,०२,०३,६००.००	२,३६,२५,७००.००	४,९०,७२,५००.००	४,५९,८१,४८५.००
कर्ज येणे बाकी	१,४६,५८,१४०.००	१,४८,३३,२२९.००	१,७८,८१,२५२.००	२,१०,७९,४६१.००	२,३२,८०,९६८.००	२,६७,२३,२०३.००	२,३१,६१,७९०.००	२,९१,६८,६३३.००	५,४६,१६,३४१.००	६,५३,६४,७६१.००
गुंतवणूक	३,९२,६३,२८५.००	३,१८,७७,२९०.००	३,०२,५४,०३०.००	२,९७,९३,०३०.००	३,२२,०८,३९०.००	३,६५,२४,२८०.००	५,०१,३४,८४०.००	५,२९,०५,४९०.००	३,९५,७०,८०५.००	४,८१,०७,००५.००
एकूण नफा	४४,०६,९३२.५५	४१,७३,७४७.२०	३९,२२,८६३.००	५५,०७,५३२.२०	६३,३२,८७९.९०	७१,९६,३३७.००	७१,६५,९९३.००	८४,४८,५१५.००	९४,६३,४६९.००	१,७३,४८,०६०.००
निव्वळ नफा	२१,३३,३८८.५५	९३,०८,५१२.२२	९४,३३,२२८.७५	९५,९०,६९४.७०	९९,२५,४५९.४२	२१,६९,९४२.२०	२३,०४,९८३.९६	२४,९९,३६३.२७	२४,९०,५१२.२१	८४,५७,९५५.०१
राखीव निधी	१,०६,७९,७६१.२३	१,१२,१४,५१८.२३	१,१५,४४,४५६.२३	१,१९,०५,३३३.२३	१,२२,८६,०६७.२३	१,२७,८७,६०३.२३	१,३३,३७,०१०.२३	१,३९,१६,७१२.२३	१,५५,८९,१८५.००	१,६३,५१,२७५.००
लाभांश समीकरण निधी	७,७५,०८३.५०	७,७५,०८३.५०	७,७५,०८३.५०	७,७५,०८३.५०	७,७५,०८३.५०	७,७५,०८३.५०	८,७५,०८३.५०	९,२५,०८३.५०	९,४०,०८३.५०	९,५०,०८३.५०
उत्पादित कर्ज निधी							४५,०००.००	९६,३९०.००	९६,४९०.००	१,५५,४९०.००
संशयित बुडीत कर्ज निधी	२३,००,०००.००	२६,००,०००.००	२२,७६,९७५.००	३२,३६,०००.००	४२,७१,०००.००	५७,११,०००.००	६१,९९,०००.००	६८.५४.८०३.४०	६१,९१,८७५.७५	२०,५४,४६१.८५
इमारत निधी	४४,०८,८५०.००	४६,१५,५१५.००	४७,०४,५५५.००	४७,०९,६९५.००	४७,१४,७५५.००	४७,९६,५१५.००	४९,४६,९५५.००	५०,९६,९५५.००	५३,४६,९५५.००	५६,९६,९५५.००
सभासद कल्याण निधी	३,००,५००.००	३,१९,५००.००	३,००,५००.००	२,९०,५००.००	२,८५,५००.००	३,२५,५००.००	३,६६,५००.००	४,०१,५००.००	४,३६,५००.००	४,३७,५००.००
श्री विश्वेश्वर शिक्षण निधी	४,०६,९३८.००	४,१४,७२९.००	४,४४,७२९.००	३,९८,३९९.००	३,८३,५२८.००	४,३४,७८६.००	४,७७,२०१.००	५,०८,२२५.००	५,९८,४४७.००	४,९४,४८५.००
लोकोपयोगी कार्य निधी	२,४०,५४६.००	२,१६,६९३.००	१,९३,५९३.००	१,७९,०३३.००	१,४४,३८१.००	१,९४,३८१.००	२,४४,३८१.००	२,९४,३८१.००	३,०९,३८१.००	३,०८,३८१.००
सभासद प्रोत्साहन निधी	२,३२,०००.००	२,३२,०००.००	२,३२,०००.००	२,३२,०००.००	२,३२,०००.००	२,३२,०००.००	२,३१,३४४.००	२,३१,३४४.००	२,२७,३२८.००	१,६४,८१६.००
एकूण उलाढाल	४,८९,०९,८८२.९३	४,९७,१२,५२४.२५	५,१५,३८,५०९.८३	५,३१,८३,६०४.३८	५,८८,५६,७६०.७०	६,७०,३१,०३४.१७	७,८१,३८,८४१.७२	८,६८,०८,७४६.२९	९,९५,४९,८३५.१०	१२,३३,४६,५७०.९१
लाभांश	१३%	१२%	१२%	१२%	१२%	१२%	१२%	१२%	१२%	
ऑडिट वर्ग	क	क	ब	क	ब	ब	ब	अ	अ	अ

श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंतचे ताळेबंद पत्रक

२०१२-२०१३ रुपये	पैसे	भाग भांडवल व देणी	रुपये	पैसे	२०१३-२०१४ रुपये	पैसे
२,५०,००,०००.००		अधिकृत भाग भांडवल			२,५०,००,०००.००	
		(प्रत्येकी रू. १००/- चे २,५०,०००)				
१,३०,१४,६६०.००		वसूल भाग भांडवल	१,४७,७६,३४०.००		१,४७,७६,३४०.००	
		राखीव व इतर निधी				
१,५५,८९,१८५.००		राखीव निधी	१,६२,५१,२७५.००			
५३,४६,९५५.००		इमारत निधी	५६,९६,९५५.००			
६१,९१,८४५.७५		संशयित बुडीत कर्ज निधी	२०,५४,४६१.८५			
४,३६,५००.००		श्री विश्वेश्वर सभासद कल्याण निधी	४,३७,५००.००			
५,१८,४४७.००		श्री विश्वेश्वर शिक्षण निधी	४,९४,४८५.००			
९,४०,०८३.५०		लाभांश समीकरण निधी	९,५०,०८३.५०			
३,०९,३८१.००		श्री विश्वेश्वर लोकोपयोगी कार्य निधी	३,०८,३८१.००			
२,२७,२२८.००		सभासद प्रोत्साहन निधी	१,६४,८५६.००			
१,४५,०००.००		श्री विश्वेश्वर कर्मचारी कल्याण निधी	१,४०,०००.००			
८,४९,०००.००		सुवर्ण महोत्सव निधी	८,५६,०००.००			
३,०८,५००.००		संगणीकरण निधी	३,०८,५००.००			
३,१३,७१३.००		घसारा निधी	४,१८,२८४.००			
९६,४१०.००		उत्पादित कर्ज तरतुद निधी	१,५५,४९०.००		२,८२,३६,२७१.३५	
		इतर निधी (कर्मचारी)				
२,९३,६४०.००		कर्मचारी अंशदान निधी	३,७०,२३३.००			
७,१६,९३९.००		कर्मचारी भविष्य निर्वाह निधी	८,८४,१७७.००		१२,५४,४१०.००	
४,५२,९७,४८७.२५		बेरीज पुढील पानावर			४,४२,६७,०२१.३५	

श्री. दिलीप दशरथ केळंबेकर
अध्यक्ष

श्री. निलेश विठ्ठल सकपाळ
सचिव

श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंतचे ताळेबंद पत्रक

२०१२-२०१३ रुपये	पैसे	जिंदगी व येणी	रुपये	पैसे	२०१३-२०१४ रुपये	पैसे
		रोख व बँक शिल्लक				
१९५.१९		रोख शिल्लक	३२४.०९			
४८,०७७.८५		महाराष्ट्र राज्य सह. बँक (लालबाग शाखा)	४२,०८७.४९			
९,०३,६९५.१३		मुंबई बँक ओ. डी. खाते (वरळी शाखा)	२१,७९७.५०			
२,७९६.८०		मुंबई बँक -चालू खाते (वरळी शाखा)	२,७९६.८०			
४,१७७.९२		मुंबई बँक -बचत खाते (जोगेश्वरी शाखा)	१०,९४०.९४			
२५,५१४.२८		मुंबई बँक (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाते)	३३,४५७.२८			
६,७९०.००		अपना बँक चालू खाते (लोअरपरेल शाखा)	४,३९६.५१			
५,२४६.००		इंडियन ओवरसिस बँक (पां.बुधकर मार्ग शाखा)	५,८१२.००		१,२१,६१२.६१	
		गुंतवणूक				
		अ) भाग				
१,०००.००		महाराष्ट्र राज्य सह. बँक	१,०००.००			
१,०००.००		मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह. बँक	१,०००.००			
३,०००.००		म. रा. स. पतसंस्था फेडरेशन	३,०००.००		५,०००.००	
		ब) मुदत ठेवी				
२०,२३,६००.००		महाराष्ट्र राज्य सहकारी बँक	२०,२३,६००.००			
२,८५,६८,००५.००		मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह. बँक	४,०७,१८,००५.००			
२,४५,०००.००		कॅश सर्टिफिकेट (मुंबई बँक)	२,४५,०००.००			
६,८१,२००.००		मुंबई बँक (पी. एफ)	८,९०,४००.००			
४०,००,०००.००		सारस्वत सहकारी बँक	०.००			
३९,३३,०००.००		अपना सहकारी बँक	४९,०५,०००.००		४,८७,८२,००५.००	
		क) लॉकर डिपॉझिट				
६५,०००.००		अपना सहकारी बँक	७०,०००.००			
५०,०००.००		इंडियन ओवरसिस बँक	५०,०००.००		१,२०,०००.००	
४,०५,६७,२९८.१७		**बेरीज पुढील पानावर**			**४,९०,२८,६१७.६१**	

श्री. किशोर घारु रसाळ
खजिनदार

श्री. बाबासाहेब बी पवार
अंतर्गत लेखा परिक्षक

श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंतचे ताळेबंद पत्रक

२०१२-२०१३ रुपये	पैसे	भाग भांडवल व देणी	रुपये	पैसे	२०१३-२०१४ रुपये	पैसे
४,५२,९७,४८७.२५		मागील पानावरुन			४,४२,६७,०२१.३५	
		सभासद ठेवी				
२,१५,००,४८९.००		मुदत ठेव	२,७०,००,९९१.००			
२३,४७,९४०.००		आवर्त ठेव	३३,५६,९९०.००			
१,०२,६५,१८०.४४		बचत ठेव	१,१४,५४,६३४.२४			
११,८२,७५२.००		दैनंदिन बचत ठेव	१५,४२,५६०.००			
७,२००.००		दामदुप्पट ठेव	३४,८९,८००.००			
३,८००.००		ठेव संकलन योजना ठेव	०.००			
५,०५,०००.००		मासिक ठेव योजना	११,२५,०००.००			
५३,०३,३००.००		महालक्ष्मी धनवृद्धी ठेव	५०,४७,८००.००			
३८,१७,९००.००		सुवर्ण महोत्सव ठेववृद्धी योजना	९१,५८,७०५.००			
२५,५४,०००.००		विशेष ठेव संकलन योजना	०.००			
१,४२,९१३.७५		अनक्लेम ठेव	२२,२२५.००			
०.००		श्री विश्वेश्वर वास्तुसिद्धि ठेव	२३,००,०००.००		६,४४,९८,७०५.२४	
		सभासद ठेव देणे व्याज				
२८,७९,०६०.००		मुदत ठेव देणे	२९,२१,९८३.००			
२,९१,३१८.००		आवर्त ठेव देणे	३,७६,३२६.००			
२६,२२६.००		दैनंदिन बचत ठेव देणे	३१,७६५.००			
१२,२००.००		दामदुप्पट ठेव देणे	१,५७,५१२.००			
६६३.००		ठेव संकलन योजना ठेव देणे	०.००			
२,१३,४७९.००		महालक्ष्मी धनवृद्धी ठेव देणे	६,६७,०४५.००			
१५,४३०.००		सुवर्ण महोत्सव ठेववृद्धी योजना देणे	७,३४,६९४.००			
४,२४५.००		विशेष ठेव संकलन योजना देणे	०.००			
१,४५२.००		अनक्लेम ठेव	२४,८७३.७५			
०.००		श्री विश्वेश्वर वास्तुसिद्धि ठेव	१७,९००.००		४९,३२,०९८.७५	
		लाभांश देणे				
७,२१३.००		सन २००९-२०१०	०.००			
४,९५८.००		सन २०१०-२०११	४,०५८.००			
२,४१२.००		सन २०११-२०१२	१,४८८.००			
०.००		सन २०१२-२०१३	६,०९४.००		११,६४०.००	
९,६३,८६,६१८.४४		बेरीज पुढील पानावर			११,३७,०९,४६५.३४	

श्री. दिलीप दशरथ केळंबेकर
अध्यक्ष

श्री. निलेश विठ्ठल सकपाळ
सचिव

श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंतचे ताळेबंद पत्रक

२०१२-२०१३ रुपये	पैसे	जिंदगी व येणी	रुपये	पैसे	२०१३-२०१४ रुपये	पैसे
४,०५,६७,२९८.१७		मागील पानावरुन			४,९०,२८,६१७.६१	
		सभासद कर्ज				
१०,०४,४६९.००		वैयक्तिक कर्जे	५,९६,८१२.००			
१,६५,३५,१५३.००		व्यावसायिक कर्जे	१,३६,४७,५१०.००			
२,५५,१५,७५०.००		वाहन तारण कर्जे	२,६८,२२,३४४.००			
२२,३०८.००		शैक्षणिक कर्जे	७१,६२१.००			
१,०१,७१,३२१.००		सोने तारण कर्जे	१,७९,४३,९५२.००			
१२,७१,२१७.००		मुदत ठेव तारण कर्जे	१०,५१,५८८.००			
४८,०००.००		दैनंदिन ठेव तारण कर्जे	०.००			
४५,४२३.००		आवर्त ठेव तारण कर्जे	२६,९०४.००			
२,७००.००		उत्सव अॅग्रीम कर्जे	१०,०००.००			
०.००		गृह तारण कर्ज	५१,९४,०३०.००		६,५३,६४,७६१.००	
		बँक गुंतवणुकीवरील येणे व्याज				
२,९७६.००		मुदत ठेवीवरील व्याज येणे	२,४१,९७९.००		२,४१,९७९.००	
		मालमत्ता / जमिन व इमारत				
७,२९,७७०.००		फर्निचर	७,२९,७७०.००			
		अधिक - नविन खरेदी	६,७५०.००			
		वजा - घसारा	७३,३१५.००		६,६३,२०५.००	
८१,०९८.००		संगणक	८१,०९८.००			
		अधिक - नविन खरेदी	३८,२२१.००			
		वजा - घसारा	६६,६२६.००		५२,६९३.००	
३७,६४५.००		वातानुकुलित यंत्र	३७,६४५.००			
		अधिक - नविन खरेदी	९,०००.००			
		वजा - घसारा	६,९९७.००		३९,६४८.००	
१४,४९६.००		दैनंदिन ठेव मशिन	१४,४९६.००			
		अधिक - नविन खरेदी	०.००			
		वजा - घसारा	२,१७४.००		१२,३२२.००	
१,३३,५५७.००		इलेक्ट्रिक अक्सेसरी	१,३३,५५७.००			
		अधिक - नविन खरेदी	१,०५०.००			
		वजा - घसारा	२०,११२.००		१,१४,४९५.००	
१८,३१५.००		नोटा मोजण्याची मशिन	१८,३१५.००			
		अधिक - नवीन खरेदी	०.००			
		वजा - घसारा	२,७४७.००		१५,५६८.००	
९,६२,०१, ४९६.१७		बेरीज पुढील पानावर			११,५५,३३,२८८.६१	

श्री. किशोर घारु रसाळ
खजिनदार

श्री. बाबासाहेब बी पवार
अंतर्गत लेखा परिक्षक

श्री विश्वेश्वर सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंतचे ताळेबंद पत्रक

२०१२-२०१३ रुपये	पैसे	भाग भांडवल व देणी	रुपये	पैसे	२०१३-२०१४ रुपये	पैसे
९,६३,८६,६१८.४४		मागील पानावरुन			११,३७,०९,४६५.३४	
		इतर देणी (तरतुद)				
६०,०००.००		वैधानिक ऑडीट फी देणे	६५,०००.००			
